दिनांक – ०१.०२.२०१९.

## प्रेसनोट

**आरोपी प्रविण सुदामराव पायघन , खाजगी इसम रा.जयपुर ता.सेनगाव जि.हिंगोली यांनी लाचेची मागणी केल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

---

पिडीत तक्रारदार यांनी दि.२३.०१.२०१९ रोजी तक्रार दिली की, त्यांचे भाउ नामे जर्नाधन पायघन यांच्या मौ. जयपुर ता.सेनगाव जि.हिंगोली या गावातील गट क्रमांक ५९८ चे शेतात रोजगार हमी योजनेतुन २,९०,०००/- रूपये चे सिंचन विहिरी करीता मंजुरी मिळाली असुन लाभार्थींचे यादीमध्ये त्यांचे नाव समाविष्ठ झालेले होते

लाभार्थींचे यादी वरून पंचायत समिती सेनगाव येथील श्री देशपांडे पालक तांत्रिक अधिकारी यांनी तक्रारदार यांच्या मंजुर सिंचन विहीरीच्या गट क्र. ५९८ च्या शेतास प्रत्यक्षात आरोपी खाजगी इसम नामे प्रविण सुदामराव पायघन यांच्यासह भेट देवुन विहीरीचे मार्कआउट करून घेतले होते

आरोपी खाजगी इसम याने तक्रारदार यास पालक तांत्रिक अधिकारी श्री देशपांडे हे माझे ओळखीचे असुन त्यांनी तुझी विहीरीचे केलेल्या मार्कआउटचे बक्षिस म्हणुन रूपये १००० रू. व येथुनपुढे विहीरीचे संदर्भातील झालेल्या कुशल अकुशल कामाचे मोजमाप पुस्तीके मध्ये नोंदी करून सदरची मोजमाप पुस्तीका वेळोवेळी पंचायत समिती सेनगाव या ठिकाणी सादर करण्यासाठी मंजुर रक्कम २,९०,०००/- रू. चे १० % रक्कम ३०,०००/- असे एकुण ३१,०००/- रू. लाचेची मागणी पालक तांत्रिक अधिकारी श्री देशपांडे यांचेवर त्यांची ओळख असल्याचा प्रभाव पाडुन तक्रारदार यांच्या विहीरी बाबतची सर्व सरकारी कामे करून देण्याची जबाबदारी घेवुन ते काम आरोपी खाजगी इसम हा करून देणार होता म्हणुन आरोपीने तक्रारदार याना लाचेची मागणी करून ती स्विकारण्यास सहमती दिली म्हणुन भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील कारवाई सुरू आहे

ही कार्यवाही श्री संजय लाठकर, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री रविंद्र थोरात यांनी पोलीस निरीक्षक श्री नितीन देशमुख, श्री सुभाष आढाव, श्री अभिमन्यु कांदे, श्री विजय उपरे, पोना श्री संतोष दुमाने, श्री महारुद्र कबाडे, श्री शेख जमिर, पोशि श्री प्रमोद थोरात, श्री अवि किर्तनकार, श्री विनोद देशमुख, चालक पोना गजानन आगलावे यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार याना तक्रार देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मार्फत मोबाईल ॲप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे

**टोल फ्री क्र.१०६४**, दुरध्वनी क्र. ०२४५६–२२३०५५.
श्री संजय लाठकर, पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, लाप्रवि नांदेड.
मोबाईल क्रमांक ९९२३०२८१२२, दुरध्वनी क्र. ०२४६२–२५५८११.
मोबाईल क्रमांक ९८२३२१५१९५, ९९२००४९२३२ व ९९२३०४२५६५.

Scanned by CamScanner